Vol III Issue I Feb 2013
Impact Factor : 0.2105
ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue.1,Feb. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# दलित चळवळीचे वास्तववादी दर्शन घडविणारे वाटा पळवाटा नाटक

संजय संभाजी लांडगे

मराठी विभाग` अे . आर . बुर्ला महिला महाविद्यालय़ सोलापूर .

*सारांशः*

दलित साहित्य ही गेल्या काही वर्षातील एक नवीन वाड् . मयीन चळवळ आहे . परंतु ती निखळ वाड् . मयीन चळवळ नसून तिचा आपल्या सामाहिक परिवर्तनाशी फार घनिष्ठ असा संबंध आहे . मराठी साहित्याच्या निळया क्षितिजावर दलित साहित्याच्या रूपाने 'निळी पहाट' उदयाला आली आहे . कथा़ कविता़ कादंबरी़ नाटक़ स्वकथने इत्यादी माध्यमातून उपेक्षितांचे जीवन हे साहित्य चित्रित करीत आहे .

प्रस्तावना -

## 1) दलित वाड्. मय आणि ललित वाड्. मय :

दलितांनी दलितांच्या जीवनाबद्दल लिहिलेले वाड् . मय म्हणजे दलित वाड् . मय ललित वाड् . मयाप्रमाणेच कथा़ कविता़ कादंबरी़ नाटक़ आत्मचरित्र हे त्यांचे बाह्यरूप आहे . त्याचा आकाऱ घाट त्याचा होणारा भावनिक परिणाम इत्यादी सर्व ललित वाड् . मयाप्रमाणेच दिसतात . परंतु दलित वाड् . मय ही ललित वाड् . मयाची शाखा नव्हे . निदान दलित लेखक व समीक्षक यांच्या दृष्टीने तरी ललित वाड . मयातील तो एक प्रवाह नाही . त्यांच्या दृष्टीने तर दलित वाड् . मय हा स्वतंत्ऱ स्वयंभू असा वाड् . मय प्रकार आहे . त्याची प्रेरणा़ स्वरूप तत्त्वज्ञान व फलश्रुती या सर्व बाबतीत दलित वाड् . मय हे ललित वाड् . मयापेक्षा संपूर्ण निराळे आहे .[1]

## 2) दलित म्हणजे काय ?

'दलित या शब्दाचा पारंपरिक अर्थ घेऊनच दलित साहित्याकडे पाहिले गेले आहे . अस्पृश्य समजल्या जार्णाया जन्मला़ त्याला दलित असे समजले जाते . मागासलेल्या सर्वच जातींचा म्हणजे महाऱ मांग़ मांगगारूडी इत्यादींचा समावेश व आदिवासी़ भिल्ल़ कातकरी़ वडाऱ डोंबरी़ कैकाडी इत्यादी जमाती यांचा समावेश दलित या संज्ञेने केला जातो . वास्तविक पाहता आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गाचाही त्यात समावेश करण्यास हरकत नाही़ परंतु भारतीय समाजाची अर्थव्यवस्था़ परंपरेने जातिवर्णा ंशी निगडित असल्याने अर्थदलितत्त्व हे वर्ण दलितत्वाचा भाग समजाला जातो .

अनेक वाद :

दलित साहित्याबद्दल अनेक प्रश्ऩ अनेक वाद निर्माण झलो आहेत . साहित्य हे दलित असते का ऋ दलित साहित्य फक्त दलितांनीच लिहावे का ऋ दलित हा शब्द एखाद्या जतीपुरता मर्यादित आहे की त्यात सर्व शोषित येतात ? दलित कोणाला म्हणावे ऋ दलित साहित्याची ही वेगळी चूल कशासाठी ?

या सर्व प्रश्नांची उत्तरे दलित लेखकांनी किंवा साहित्यिकांनी़ समीक्षकांनी दिलेली आहोत . मार्क्सवादी जातीयवादी़ पुरोगामी अशा अनेक दृष्टीने त्याच्याकडे पाहिले गेले आहे आणि या सगळया दृष्टीकोणापेक्षा वेगळी भूमिका घेऊन दलित सहित्य आकारला आले आहे .

'दलित या संकल्पनेचे विविध पैलू

दलित साहित्याच्या संदर्भात अनेकांनी 'दलित' शब्दाच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे . त्याचा परामर्श घेऊन पुढील वाटचाल करणे संयुक्तिक ठरेल .
मरठी भाषेच्या कोषात दलित शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे दिलेला आहे . दलित म्हणजे दळलेले़ भरडलेले़ दाबलेले़ भरडले गेलेले़ गांजलेले .
हिंदी भाषेच्या कोषात दलित शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे दिलेला आहे . दलित याने मसला़ रौंदा या कुचला हुआ़ नष्ट किया हुआ .
परंतु दलित सहित्याची बैठक ज्या डॉ . आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे हे प्रथमतः समजून घेतले पाहिजे .

डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी दलित या शब्दाची व्याप्ती आपल्या ग्रंथामधून निरनिराळे शब्दप्रयोग करून सांगितली आहे . दलितत्त्वाचे कारण भारतीय समाजरचना आहे . भारताच्या निरनिराळया भागात़ प्रांतात़ अस्पृश्य वर्गाला प्राप्त झालेली नावे वेगवेगळी आहेत .

डॉ . आंबेडकरांनी 'Untouchables' या शब्दाकरिता 'Depressed classes, असे शब्द वापरले आहेत . तसेच 'अस्पृश्य' शब्दाची व्याप्ती केवढी मोठी आहे याची कल्पना़ त्यांच्या 'Untouchables' या ग्रंथात दिलेल्या अस्पृश्यातील पोटजातींच्या मोठया यादीवरून येते . याचा अर्थ असा की़ डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गालाच दलित म्हटले आहे .

डॉ . आंबेडकरांच्या युगप्रवर्तक वाणीला स्मरूनच पुढे दलित साहित्यिकांनी 'दलित' या शब्दाची कक्षा जगभरच्या शोषितांना कवटाळतील अशा उभ्या करून ठेवल्या आहेत .

**Title :** दलित चळवळीचे वास्तववादी दर्शन घडविणारे वाटा पळवाटा नाटक
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** संजय संभाजी लांडगे **yr:2013 vol:3 iss:1**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात 'दलित हा मानवी प्रगतीतील सर्वात मागे पडलेला व मागे रेटलेला सामाजिक वर्ग आहे .

डॉ . म . ना . वानखेडे यांच्या मते 'दलित शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीय नव्हे तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ट होतात .

डॉ . सदार कऱ्हाडे यांनी 'आर्थिकदृष्टया व सामाजिकदृष्टयशा मिळून एक सर्वसमावेशक दलित वर्ग मानता येईल . त्यात कामगार शेतमजूर उपजीविकेसाठी श्रमणारे व अस्पृश्यही येतील ज्यांची पिळवणूक होते ते दलित अशी व्यारूया केली आहे .[2]

डॉ . प्रभाकर मांडे म्हणतात 'ज्यांना माणसासारखे मानाने जगणे नाकारले गेले आहे ते दलित नामदेव ढसाळ यांच्या मते दलित म्हणजे अनुसूचित जाती जमाती बौद्ध कष्टकरी जनता कामगार भूमिहीन शेतमजूर गरीब शेतकरी भटक्या जमाती आदिवासी इ .[3]

वरील सर्व व्याख्यांवरून 'दलित' या शब्दप्रयोगाद्वारे आर्थिक सामाजिक व सांकस्तिक मागासलेपण आणि त्यातून येणारे दुबळेपणच प्राधान्याने सूचित केले आहे .

## दलित साहित्याच्या व्याख्या

### बाबुराव बागुल -

दलित साहित्याची व्याख्या करताना म्हणतात 'माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे माणसाला महान करणारे वंश धर्म जाती श्रेष्ठत्वाला विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य .'

डॉ . यशवंत मनोहर म्हणतात 'दलित साहित्य हे वर्णबळीचे व वर्गबळीचे आहे . हे साहित्य डॉ . बाबासाहेबांच्या वाणीचा वाङ् . मयीन वणवा आहे . संस्कृतीने ज्यांची पोटे आणि मन उपाशी ठेवली त्या उपेक्षितांच्या हृदयाचे मेंदूचे हे जिवंत ललित आकार अहोत ; या साहित्याच्या पोटी  एक मानवकेंद्री सुवर्णयुगाचा गर्भ वादळी निकराने वाढतो आहे .'

दि . के . बेडेकर यांच्या मते 'माझा समाज आजवर दलित होता . त्याला आता प्रतिष्ठा पाहिजे ही प्रवत्ती या साहित्यात दिसते . वास्तव लढाऊ समाज परिवर्तनाची व माणुसीकीची जिद्द तिचा उद्गार व आविष्कार म्हणजे दलित साहित्य .'

लेखकाच्या जीवन जाणीवाच्या उत्कटतेवरच साहित्याचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व अवलंबून असते . प्रतिभावंताची संवेदनशीलता एकदा मान्य केली की व्यापक जीवनानुभव घेण्याचे त्याचे सामर्थ्य मान्य करावे लागते .

## दलित साहित्यातील प्रेरणास्त्रोत

दलित साहित्यामागील मुख्य प्रेरणास्त्रोतांचा विचार करताना डॉ . आंबेडकरांची विचारप्रणाली प्रामुख्याने जाणवते . दलितांना त्यांच्या जीवनातील प्रखर वास्तावाची जाणीव करून देर्णाया व दलित जातीत जन्माला आलेल्या डॉ . आंबेडकरांसारख्या विद्वान महापुरूषाने आपला विचार आणि प्रचाराने स्वसमाजाचे आत्मभान जागृत केले . अर्थात आंबेडकरी विचारप्रणेबरोबरच भगवान बुद्ध कार्लमार्क्स आणि महात्मा फुले यांच्याही काही प्रेरणाचे अंश या साहित्यात आढळतात . केवळ मनोरंजन हे दलित साहित्याचे उद्दिष्ट नाही तर 'स्व' आणि 'स्वेतर' समाजाला त्यांच्या पारंपारिक मगरमिठीतून बाजूला करणे हा त्याचा हेतू असल्याने या प्रेरणा साहित्याच्या विविध आकार प्रकारात अभिव्अक्त होताना दिसतात व त्यामुळे दलित साहित्यात सामान्यतः भावनाभिव्यक्तपेक्षा विचारांनाच प्राधान्य लाभलेले दिसून येते . दलित साहित्यात हे विचाराच भावनेचे रूप घेतात .

## दलित साहित्याचे स्वरूप

स्वातंज्योत्तर काळात मराठी साहित्यक्षेत्रात निर्माण झालेला एक सामर्थ्यवान प्रवाह असे दलित साहित्याचे वर्णन करता येईल . डॉ . बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने जागृत झालेल्या दलित समाजात स्वातंज्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाला . त्यातून प्राप्त झालेल्या नव्या जाणिवेने दलित तरूण जीवनाकडे पाहू लागले . स्वतःच्या समाजाची शतकानुशतकांपासून चालत आलेली दुःसह स्थिती ती निर्माण होण्याचे कारणे यांचा ते विचरा करू लागले . दलित समाजाला या र्सा यांमुळे अतीव दुःखदायक अनुभवांचे कारण हजारो वर्षांपासून चालत आलेली भारतीय संस्कृती परंपरा आणि समाजव्यवस्था हेच आहे जाणवले . असह्य दुःख आणि दात्ण मनोभंग यांच्या चटक्यांनी पोळून निघालेली ही दलित मने म्हणूनच र्सायांच्या विरूद्ध बंड करून उटली . दलितांचे दुःख तज्जन्य प्रक्षुब्धता आणि विद्राह यातून दलित साहित्याचा जन्म झालेला आहे . म्हणूनच अन्यायी संस्कृती परंपरा समाजव्यवस्था यांना दलित साहित्याने नकार दिलेला आहे . त्यांच्याविरूद्ध त्याने विद्रोह पुकारलेला आहे . त्या र्सायांचा विध्वंस करून नवे मानवतावादी समतावादी विज्ञाननिष्ठ दृष्टीचे जग निर्माण करण्याची त्याची मनिषा आहे . नकार विद्रोह मानवता आणि विज्ञाननिष्ठ दृष्टी ही दलित साहित्यिकांनी प्राणभूत तत्त्वे मानलेली आहेत . दलित साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकी पत्करलेली असून तिनेही त्यांच्या साहित्यानिर्मितीला काही एक स्वरूप प्राप्त करून दिले आहे . अन्यायाबद्दलची चीड शतकानुशतकांचे दुःख दुःखकराणांचा निषेध नवसमाजनिर्मिती आस इत्यादींनी युक्त असलेल्या दलित साहित्याने जाणिवांचा जीवनानुभवांचा एक प्रभावी स्त्रोत मराठी साहित्यात आणला असून साहित्याविषयीच्या सर्व कल्पनांना जबरदस्त धक्के दिलेले आहेत .[4]

दलित साहित्य हे फुले आंबेडकरांच्या विचारांना स्वीकारते . रा . ग . जाधव म्हणतात त्याप्रमाणे कोणत्याही नव्या विचारप्रवाहांनी आपली परंपरा शोधावयाची असते . दलित साहित्य हा विचार भौतिकवादी असल्यामुळे प्राचीन भारतातील बुद्धाची परंपरा ही दलित साहित्याची परंपरा आहे . दलित साहित्य सामाजिक जाणिवेतून लेखन करते . जातिभेद व अस्पृश्यतेला विरोध करते आणि समता न्याय बंधुत्व या मूल्यांना स्वीकारते .[5] दलित दाहित्य हे मराठी साहित्यापेक्षा पृथगात्म अशा वैचारिक आशयाने युक्त आहे . दलित साहित्यातील कविता कथा नाटक कादंबरी निबंध इत्यादी वाड . मय प्रकार नव्या जाणिवांनी प्रकट झाले आहेत . त्यामुळे त्याचे स्वरूप प्रस्थापित ब्राम्हणी साहित्यापेक्षा समतेच्या अनुभूतीचे संवेदनाविश्व घेऊन प्रकटले आहे असे डॉ . प्रभाकर मांडे इत्यादींनी कबूल केले आहे .

दलित साहित्य हे शोषण व्यवस्थेविरूद्ध आपल्या कलाकृतीतून विद्रोह व्यक्त करीत आहे . अस्पृश्यता जातीयता व दैन्य या सामाजिक आर्थिक सांस्कृतिक अन्यायाला मूठमाती देण्यासाठी शब्दांचा हत्यार म्हणून उपयोग करते आहे . समाजवादी कला व समाजवादी समाजनिर्मितीसाठी दलित साहित्य जन्मत आहे .[6]

गावकुसाबाहेर भोगलेले जीवन बेभानपणे शब्दांतून मांडत सुटले आहेत . जमीनदाराकडून पाटलाकडून होणारे अन्याय कर्थाकादंबरीतून उभे केले जात आहेत . पिण्याच्या पाण्यासाठी व मंदिरातील प्रवेशासाठी माणसाचे माणूसपण नाकारर्णाया धर्मपरंपराविरूद्ध समतेचा आविष्कार नाटकातून उदयास येत आहे . आजपर्यंतच्या मराठी कलाकृतीतून जे जीवन उभे राहिले नाही ते दलित साहित्यिक निर्भीडपणे मांडत आहेत . आपल्या अनुभवाला साहित्य रूप देत आहेत . दलित साहित्याची चळवळ ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अपूर्व आणि असमान्य महत्त्वाची घटना आहे . हजारो वर्षे मूक राहिलेल्या दलितांच्या अन्तःकरणातील व्यथा आणि वेदना प्रक्षोभ आणि विद्रोह यांना याच चळवळीमुळे शब्दरूप मिळाले . त्यातूनच निर्माण झालेल्या दलित साहित्याने एक नवा शक्तिस्त्रोत मराठी साहित्यात आणून सोडला असे आगळेवेगळे जीवनदर्शन दलित साहित्याने मराठी साहित्यात आणले आहे याची स्पष्ट कबुली पु . ल . देशपांडे यांनीही दिली आहे . ते म्हणतात '

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net